**<u>फौ.कि.अर्ज क्र.३७२/२०१७</u>**

**<u>अर्जदार तर्फे सा.क्र.३ उर्वरीत सरतपास अर्जदारातर्फे वकिल श्री.ए.जी. शहा यांच्यामार्फत शपथेवर सुरूः—</u>**

आता मला यादी **नि.१०४** वरील अ.क्र.१ वरील प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावरती केन अकाउन्टन्ट व तयार करणार शब्बीर पठाण यांची सही आहे व त्यावर कर्मयोगी कारखान्याचा शिक्का आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.१०५</u>** देण्यात येते. **नि.१०५** वरील प्रमाणपत्र हे यादी **नि.१०१** वरील अ.क्र.५ वरील ॲडव्हान्स पेमेन्ट शिटच्या अनुषंघाने दिलेले आहे. त्यावरी केन अकाउन्टट यांची सही व शिक्का आहे. ते पेमेन्टशीट संतोष देवकर याच्या नावाचे आहे. ते सन २०२० ते २०२१ या कालावधीतील आहे. दुसरे सन २०२१ चे पेमेंन्टशीट हे भारत तुकाराम देवकर याचे नावे आहे. त्याचबरोबर तिसरे २०२२—२०२३ पेटेमन्टशीट हे कमल तुकाराम देवकर यांचे नावे आहे. वर नमूद तिन्ही बीलावर चिफ अकाउन्टन्ट व केन अकाउन्टन्ट यांच्या सहया व कर्मयोगी कारखान्याचा शिक्का आहे.

आता मला यादी **नि.१०३** वरील अ.क्र.२ वरील सभासद उस नोंदणी माहितीपत्रक दाखविण्यात आले. सदर माहितीपत्रक हे कमल, भारत व संतोष तुकाराम देवकर यांच्या नावाचे सन २०१७ ते सन २०२५ या कालावधीतील आहे. सदरचे माहितीपत्रकाची प्रत ही संगणकावरून घेण्यात आली आहे. त्यावर माहितीपत्रक तयार करणार सचिन शेंड व मुख्य शेतकी अधिकारी श्री हिंगमीरे यांची सही व कारखान्याचा शिक्का आहे.

<u>उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u>

श्रवणोत्तर स्विकत,

इंदापूर. **(श्रीमती. एस. एस. साळुंखे)**

दि.०९/१२/२०२४. ३रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता.इंदापूर, जि. पुणे.

**सा.क्र.३ चा उर्वरीत उलटतपास जाबदेणारतर्फे वकिल श्री. एन. जी शहा यांच्यामार्फत शपथेवर सुरू:—**

मी कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्यात वसुली सहायक म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वत: शेती विभागात कामी करीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे अधिकारपत्रामध्ये शेती विभागामध्ये वसुली सहायक असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की मी स्वत शेती विभागात काम करतो याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७—१८, २०१८—१९ व २०१९—२० या कालावधीत जाबदेणार यांच्या नावावर कोणताही उसाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की मी **नि.१०१** सोबत दाखल केलेल्या सभासदाची उस नोंद माहितीवरती जाबदेणार क्र.१ याचे नावे उसाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की तसेच सन २०२२—२३, २०२३—२४ या कालावधीत देखील जाबदेणार क्र.१ च्या नावे उस नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७—१८, २०१८—१९, २०२२—२३, २०२३—२४ या कालावधीतदेखील उसाचे बील जाबदेणार क्र.१ याच्या नावे दिल्याचे नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेतक—याचा उस कारखान्यास येत असेल तर त्यास आम्ही लागण चिठ्ठी देतो. हे म्हणणे खरे आहे की, तसेच जाबदेणार क्र.२ याच्या नावाची देखील सन २०१८—१९, २०१९—२०, २०२२—२३, २०२३—२४ व २०२४—२५ यास उसाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच जाबदेणार क्र.३ हिच्या नावाची देखील सन २०२३—२४ व २०२४—२५ यास उसाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२३—२४, २०२४—२५ या कालावधीत जाबदेणार यांच्या नावाची उसाचे बील नाही.

यादी **नि.१०१** सोबत दाखल केलेल्या उस बीलामध्ये जाबदेणार क्र.१ याच्या नावे दि.१६/१२/२०२० ते ३१/१२/२०२० या कालावधीमध्ये रक्कम रू.१०,३१०/—बॅकेच्या कर्जाची वजावट नमूद आहे. तसेच याच कालावधीत जाबदेणार क्र.२ याची रक्कम रू.५,६४०/— ची वजावट आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.११/११/२०२० ते दि.३०/११/२०२०या कालावधीत जाबदेणार क्र.३ ची रक्कम रू.१,३०,५७०/— ची कर्जाची वजावट आहे. तसेच दि.०१/१२/२०२१ ते १५/१२/२०२१ या कालावधीतील जाबदेणार क्र.३ ची रू.१२,०२३/— कर्जाची वजावट आहे. हे म्हणणे खरे आहे की, वर नमूद वजावट पाहता जाबदेणार यांच्यावर कर्ज होते हे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, शेतक—यांच्या उस बिलातून कर्ज हे बॅकेने मागणी केल्यांनतर वजावट होते. हे म्हणणे खरे आहे की, उस बीलातून जाबदेणार यांची शेअर अनामत रक्कम कपात केलेली आहे. हे

म्हणणे खरे आहे की, तसेच जाबदेणार क्र.३ च्या उस बीलातून तोडणी वाहतुकीची अनामत रक्कम रू.१,२४,५८१/— वजा केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, संगणक हा शेतकी विभागामध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेतकी विभागामध्ये संगणक ऑपरेटर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वत: शेतकी विभागात कार्यरत नसल्याने खाते उतारा हा संगणकावरून घ ेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.१०३ व १०४ व १०५ वरील कागदपत्रे मी खोटी दाखल केली आहेत.

**उलटतपासणी पुर्ण.**

**फेरतपास— नाही.**

श्रवणोत्तर स्विकत,

इंदापूर.                                        (**श्रीमती. एस. एस. साळुंखे**)

दि.०८/०१/२०२५.                    ३रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ता.इंदापूर,
जि. पुणे.